# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक ०७/०६/२०२२ (मंगळवार)**

**(दुपार)**

---

### देशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक
### पोलिस स्टेशन अरोली यांची कार्यवाही

दिनांक ०६/०७/२०२२ व दिनांक ०७/०७/२०२२ रोजी पोलिस स्टेशन अरोली येथे अवैधरीत्या देशी दारूची विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध दोन केसेस करण्यात आले आहे. प्रथम प्रकरणात पोलिस स्टेशन अरोली येथील स्टाफला गुप्त माहिती मिळाली की, अरोली येथे गुजरी चौकात राजकुमार वैद्य नावाचा ईसम दारु विकत आहे. अशा मिळालेल्या माहीती प्रमाने दिनांक ०६/०६/२०२२ चे १७/३० वा. ते १८.३० वा. सुमारास अरोली टाउन येथे रेड केली असता आरोपी नामे— राजकुमार निलकंठ वैद्य वय ३० वर्ष रा. अरोली ता. मौदा जिल्हा नागपूर याच्या ताब्यातुन ०९ निपा देशी दारु संत्रा ९९९ लेबल लागलेल्या कि. ७२०/—रु. चा मांल मिळुन आला आहे. सदर गुन्हयात आरोपीविरूद्ध अप क्र. ७६/२०२२ कलम ६५ ई मदाका अन्वये नोंद करण्यात आले आहे.

तसेच दुसऱ्या प्रकरणात पोलिस स्टेशन अरोली येथील स्टाफ यांना गुप्त माहिती मिळाली की, अरोली येथे खापरखेडा टोली पुलावर अरोली येथील एक ईसम दारु विकत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती प्रमाने दिनांक ०७/०६/२०२२ चे ०९.४५ वा. ते १०.३० वा. सुमारास अरोली पुलावर स्टाफने रेड केली असता आरोपी नामे— कृष्णा उर्फ गुड्डू हरिचंद्र खडसे वय ४३ वर्ष रा. अरोली ता. मौदा जिल्हा नागपूर याच्या ताब्यातुन ८० निपा देशी दारु संत्रा ९९९ लेबल लागलेल्या कि. ६,४००/—रू. व एमएच—३६/बी—१३९८ क्रमांकाची मोटरसायकल किंमत २२,०००/—रू. असा एकुण कि. २८,४००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयात आरोपी विरूद्ध अप क्रमांक ७७/२०२२ कलम ६५ ई म.दा.का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही नागपुर (ग्रामीण) पोलिस अधिक्षक मा. विजयकुमार मगर, अपर पोलिस अधिक्षक मा. राहुल माकणीकर, उपविभागीय पोलिस अधिकारी रामटेक विभाग रामटेक श्री. आर एस. चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक श्री. जोशी यांच्या नेतृत्वात सहायक फौजदार जाधव, पोलीस नाईक विशाल व पोशि श्रीकांत यांनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे.



**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**